मित्रांनो, 'हसत खेळत ब्रह्माज्ञान' या सदरात आज आपण काही मूलभूत संकल्पना समजून घेणार आहोत.

एका पार्टीत एक लावण्यवती तरुणी तुम्हाला दिसते. तुम्ही तिच्यापाशी जाऊन सांगता, 'मी खूप श्रीमंत आहे. माझ्याशी लग्न कर.'

याला म्हणतात, डायरेक्ट मार्केटिंग!

एका पार्टीत एक लावण्यवती तरुणी दिसते. तुम्ही तिच्याकडून तिचा फोन नंबर मिळवता आणि फोन करून तिला सांगता, 'मी खूप श्रीमंत आहे. माझ्याशी लग्न कर.'

याला म्हणतात, टेलिमार्केटिंग!

एका पार्टीत एक लावण्यवती तरुणी दिसते. तुमच्या मित्रांपैकी एक जण तिच्याकडे जातो आणि तुमच्याकडे बोट दाखवत तिला सांगतो, 'तो खूप श्रीमंत आहे. त्याच्याशी लग्न कर.

याला म्हणतात, जाहिरात!

एका पार्टीत एक लावण्यवती तरुणी तुम्हाला दिसते. तुम्ही तिच्यासाठी ड्रिंक तयार करता. तिला जेवण सर्व्ह करता. तिची बॅग उचलता. तिच्यासाठी दरवाजा उघडता. तिला आपल्या गाडीनं घरी सोडताना वाटेत तिला सांगता, 'मी खूप श्रीमंत आहे. माझ्याशी लग्न कर.'

याला म्हणतात, पब्लिक रिलेशन्स!

एका पार्टीत एक लावण्यवती तरुणी तुम्हाला दिसते. तीच तुमच्यापाशी येते आणि म्हणते, 'तू खूप श्रीमंत आहेस. माझ्याशी लग्न करशील?'

याला म्हणतात, ब्रँड रेकग्निशन!

एका पार्टीत एक लावण्यवती तरुणी दिसते. तुम्ही तिच्यापाशी जाता आणि सांगता, 'मी खूप श्रीमंत आहे. माझ्याशी लग्न कर.'

ती तुमच्या एक झकास कानफटात वाजवते...

...याला म्हणतात, कस्टमर फीडबॅक!!!!